# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५९६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०२०/596

दिनांक 24 FEB 2020

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व शासकीय/अनुदानीत विना अनुदानीत पद्विका/

पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या संस्था/

औरंगाबाद विभाग

**विषय : ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम आणि जिवंत रोपांची टक्केवारी अहवाल सादर करणे बाबत.**

**संदर्भ : विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०२०/वृ.सं.क./संगोपन/काविं-२१, दि.१०.०२.२०२०**

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, पुरोगामी महाराष्ट्र शासनाने राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्याच्या दृष्टिने वन जमीन, वनेत्तर जमीन आणि शेतक-यांच्या शेतजमीनीवर मोठया प्रमाणावर वृक्ष लागवड करण्याचा महत्वकांक्षी निर्णय घेतला आहे. त्यानूसार सन- २०१६ मध्ये २ कोटी, सन- २०१७ मध्ये ४ कोटी, सन- २०१८ मध्ये १३ कोटी, सन- २०१९ मध्ये ३३ कोटी असे एकुण ५० कोटी वृक्ष लागवड करण्यात आली. त्यानूसार लागवड करण्यात आलेली रोपे १००% जिवंत राहण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, या बाबत वरील संदर्भिय पत्रान्वये विभागीय आयुक्त यांच्यांकडून कळविण्यात आले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) पूर्ण लावलेली रोपे १००% जिवंत राहणेसाठी आवश्यक त्या उपाय योजना करण्यात याव्या.

२) एकही वृक्ष मरुद्यायचे नाही, मेल्यास त्या ठिकाणी त्वरीत मोठे व सुदृढ रोप लावण्यात यावे.

३) माहे सप्टेंबर/ऑगस्ट २०१९ अखेर वृक्ष लागवड केलेल्या प्रत्येक स्थळासाठी जबाबदार समन्वय अधिका-यांची नेमणूक करावी. (अशा अधिका-यांची नेमणूक यादी स्थळनिहाय सादर करावी). या अधिका-याने संबंधीत स्थळांना भेट देणे अनिवार्य करण्यात यावे. त्या अधिका-याने त्या स्थळांवरील रोपवनांतील रोपांचे संवर्धन / संगोपनाची जबाबदारी स्वीकारावी.

४) दर महिन्याला जिवंत रोपांची तपासणी करुन त्याचा अहवाल आपल्या जिल्हयातील शासकीय तंत्रनिकेतन/ शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय/ शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य / नियंत्रण अधिकारी यांना प्रत्येक महीन्याच्या ३० तारखेपर्यंत सोबत जोडलेल्या प्रपत्रात भरुन न चूकता पाठवावा.

५) जिल्हा नियंत्रण अधिकारी / प्राचार्य, शासकीय संस्था यांनी ही माहिती संबंधीत जिल्हयाचे जिल्हाधिकारी व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना प्रत्येक महीन्याच्या ५ तारखेपर्यंत न चूकता पाठवावी.

६) ज्या ठिकाणी २००० पेक्षा जास्त वृक्ष लागवड करण्यात आली आहे, अशा ठिकाणांना महिन्यातील सुट्टीच्या दिवशी शाळेचे विद्यार्थी व इतर उत्सुक नागरीक यांची सहल काढावी. त्यांचे कडून जिवंत रोपांची मोजणी करुन घेण्यात यावी. त्यामुळे लोकांचा सहभाग वाढेल आणि रोप जिवंत असल्याची खातरजमा होईल या निमीत्ताने लोक एकत्र येण्याचे केंद्र ही बनेल.

७) ५० कोटी वृक्ष लागवडीची यशोगाथा लिहिण्यासाठी, मासिक किंवा साप्ताहीक काढणेसाठी आवश्यक असलेले लिखाण (लेख, कविता, चारोळया, चित्रे, व्यंगचित्रे, फोटो, इ.) प्राप्त करुन विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करण्यात यावेत.

८) या बाबत दिरंगाई / विलंब झाल्यास मा.जिल्हाधिकारी यांचेकडून होणाऱ्या कार्यवाहीबाबत आपण जबाबदार रहाल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**सोबतः प्रपत्र**

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- ०१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

०२) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

०३) या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.

## प्रपत्र-

| अ.क्र. | कार्यकारी यंत्रणा | जिल्हा | सन 2016 | | | 2017 | | | 2018 | | | 2019 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्थळ संख्या | लावलेली रोपे संख्या | जिवंत टक्केवारी (31.10.19 ची) | स्थळ संख्या | लावलेली रोपे संख्या | जिवंत टक्केवारी (31.10.19 ची) | स्थळ संख्या | लावलेली रोपे संख्या | जिवंत टक्केवारी (31.10.19 ची) | स्थळ संख्या | लावलेली रोपे संख्या | जिवंत टक्केवारी (31.10.19 ची) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

सही-------------------

पद नाम-------------------

Scanned by CamScanner